सहायक अनुदानाच्या जलद संवितरण व संनियंत्रणासाठी आहरण व संवितरण अधिकारी आणि अशासकीय कार्यान्वयन प्राधिकारी यांच्याकरिता "आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक "(Virtual Personal Deposit Account Administrator)" घोषित करणेबाबत....

महाराष्ट्र शासन

वन विभाग,

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१३३/वने-९

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १७ जुलै, २०२६

वाचा :-

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दिनांक १४.०२.२०२४.

२. उपवनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-२(१)/असं/प्र.क्र./१७(२४-२५)/१३०/२०२५-२६, दिनांक ०७.०७.२०२५.

३. वरीष्ठ लेखाअधिकारी, महालेखाकार कार्यालय (ले. व अ)-I मुंबई यांचे क्र.TM/Gr.II/UOR-०२/VPDA-R&F/२०२६-२७/१७२, दि.०८.०५.२०२६

प्रस्तावना :-

वित्त विभागाचे वाचा क्र.१ येथील शासन निर्णय दि. १४.०२.२०२४ मधील परिच्छेद ११.१ अनुसार महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्रमांक ४४ देयकांद्वारे २७-लहान बांधकामे, ३१- सहायक अनुदान (वेतनेत्तर), ३३-अर्थसहाय्य, ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान, ५०-इतर खर्च, ५३-मोठी बांधकामे, आणि वित्त विभागाद्वारे वेळोवेळी घोषित करण्यात येतील अशा अन्य उद्देश शीर्ष (Object Head) अंतर्गत राज्याच्या एकत्रित निधीतून आहरित केल्या जाणा-या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी क्षेत्रिय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना आणि अन्य अशासकीय कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना वित्त विभागाच्या सहमतीने 'आभासी वैयक्तिक ठेव लेखा [Virtual Personal Deposit Account (VPDA)] ही व्यवस्था व कार्यपध्दती लागू करण्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग सक्षम असल्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. तसेच यासाठी शासकीय कार्यालयांच्या बाबतीत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी हेच पदनिर्देशित 'आभासी

वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक' [Virtual Personal Deposit Account Administrator] असतील. तर अन्य अशासकीय कार्यान्वयने यंत्रणांच्या बाबतीत शासनाद्वारे घोषित करण्यात येतील असे कार्यान्वयन प्राधिकारी हे पदनिर्देशित 'आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक' असतील असे नमूद आहे.

त्यानुषंगाने उपवनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या वाचा क्र. २ येथील नमूद पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन महसूल व वन विभागाच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना 'आभासी वैयक्तीक ठेव लेखा प्रशासक' [Virtual Personal Deposit Account Administrator] म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्याच्या एकत्रित निधीतून आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी या विभागाच्या अधिनस्त खालील प्रशिक्षण संस्थांकरीता खालील तक्त्यात नमूद केलेल्या पदावरील अधिकाऱ्यांना या शासन निर्णयाव्दारे "आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक Virtual Personal Deposit Account Administrator (VPDAA)" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	आहरण व संवितरण अधिकारी	डी. डी. ओ. क्रमांक
१	कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल.	अपर संचालक (प्रशासन)	२४१००००७५१

२. वरील तक्त्यात नमूद संस्थेने वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.११०/२०२३/कोषा-प्रशा-५, दिनांक १४.०२.२०२४ मधील परिच्छेद क्र. ११.३ नुसार पुढील कार्यवाही त्वरीत करावी.

३. सदर मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे:-

i. The said 'Virtual Personal Deposit Account' shall be subject to Audit.

ii. The Administrator shall ensure that all rules, regulations, terms and conditions of the relevant GR have been followed in respect of the said 'Virtual Personal Deposit Account.'

iii. No amount shall be transferred to the 'Virtual Personal Deposit Account' to avoid lapse of funds.

iv. "Virtual Personal Deposit Account' is applicable only for the State Schemes and not for Central Sector and Centrally Sponsored Schemes.

v. The Receipt to the said 'Virtual Personal Deposit Account' through Nil Bill procedure, shall be only for the bills drawn under:

(I)MTR-३१B for the object heads २७-Minor Works and ५३-Major Works;

(II)MTR-४५B for the the object heads of expenditure ३३-subsides and ५०-Other Chargers;

(III)MTR-४४ for the object heads of expenditure ३१-Grant-in-Aid (Non Salary) and ३५-Grant-in-Aid for creating of Capital Assets.

(IV)MTR-२९ for the object head of expenditure ५२-Machinery and Equipment shall be applicable from १ April २०२५.

vi. The Administrator shall timely submit the Utilization Certificate in the prescribed format after incurring expenditure from the VPDA to the offices viz. O/o The Accountant General (A&E)- I, Mumbai, O/o The Pr. Accountant General (A&E)-II, Nagpur or O/o The PAO, Mumbai as per the respective jurisdiction for the Bills drawn under MTR-४४ for the object heads of expenditure ३१-Grant-in-Aid (Non Salary), ३५-Grant-in-Aid for creation of Capital Assets. For bills drawn under MTR-३१८, MTR-४५८, MTR-२९ the Utilization Certificate shall be submitted to the concerned administrative department.

vii. The expenditure from the VPDA shall be as per the Sanction order of the respective Grant,

viii. The balances under the VPDA shall be reconciled monthly by the Administrator with the District Treasury Officer.

ix. The balances shall be reconciled with O/o The Accountant General (A&E) by the District Treasury Officer who shall submit Balance Certificate to O/o The Accountant General (A&E) for confirmation of their balances in the books of O/o The Accountant General (A&E) at the end of the Financial Year.

x. Monthly Plus Minus Memo related to this "Virtual Personal Deposit Account' shall be sent to the O/o The Accountant General (A&E).

xi. The unspent balances under the VPDA shall be credited back to the Consolidated Fund of the State after completion of one year (३६५ days) from the date of drawal of the funds/ date of credit of amount to VPDA or the timeline mentioned in the sanction order whichever is earlier.

xii. १२-All the conditions/instructions in the Financial Department GR No. संकीर्ण/२०२३/ प्र.क्र.११०/२०२३/कोषाप्रशा-५ dated १४-०२-२०२४ and GR No. संकीर्ण/२०२३/प्र.क्र.११०/२०२३/ कोषाप्रशा-५ dated १२-०३-२०२५ shall be followed.

xiii. All Rules of Maharashtra Treasury Rules, १९६८ shall be applicable to the 'Virtual Personal Deposit Account

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ चे परिपत्रक व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दि.१८ जुलै, २०२५ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय वरीष्ठ लेखाअधिकारी, महालेखाकार कार्यालय (ले. व अ)-I मुंबई यांनी वाचा क्र.३ नुसार दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२२८/व्यय-१०,दिनांक २७.०२.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०७१७१४४२१८३३४० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.17 14:43:13 +05'30'

(साहेबराव घिगे)

अवर सचिव (वने), महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव
५. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८. वित्त विभाग, प्रशा-४/५ कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल.
१०.कार्यासन वने-९, वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)